महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : २४६ वा | दिनांक : २६/०७/२०२५ | वार : शनिवार

# मंत्रिमंडळात फेरबदलाचे अधिकार मुख्यमंत्री यांचे : अजीत पवार



**मुंबई** : राज्य मंत्रिमंडळात लवकरच फेरबदल होणार असून काही मंत्र्यांना घरचा रस्ता दाखवला जाणार असल्याची चर्चा गेल्या काही दिवसांपासून सुरू आहे. याबाबत पत्रकारांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांना प्रश्न विचारले असता या संदर्भातील सर्व अधिकार हे मुख्यमंत्री यांचे असतात.

त्यामुळे मंत्रिमंडळात कोणाला ठेवायचे आणि कोणाला काढायचे? त्याचा सर्वस्वी निर्णय मुख्यमंत्री घेत असल्याचे अजित पवार यांनी म्हटले आहे. माणिकराव कोकाटे यांच्या संदर्भात आपण सोमवारी मुख्यमंत्र्यांशी चर्चा करणार असून या संदर्भात मंगळवारपर्यंत निर्णय होईल, असे देखील त्यांनी स्पष्ट केले.

अखिल भारतीय छावा संघटनेचे प्रदेशाध्यक्ष विजय घाडगे यांना मारहाण करणाऱ्या सूरज चव्हाण यांच्या संदर्भात अजित पवार यांनी सांगितले की, त्यांना सध्या पदावरून काढण्यात आले आहे. त्यांनीही अजून माझी भेट घेतलेली नाही. त्यांना भेटून त्यांची देखील बाजू ऐकणार असल्याचे अजित पवार यांनी सांगितले. त्याच बरोबर विधिमंडळात रम्मी खेळण्याचा आरोप झालेले कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांच्यावरही मंगळवारपर्यंत योग्य ती कारवाई करणार असल्याचे संकेत अजित पवार यांनी दिले आहेत. या संदर्भात सोमवारी कोकाटे आणि मुख्यमंत्र्यांसोबत आपण चर्चा करणार असल्याचे ते म्हणाले.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पत्रकारांच्या सर्वच प्रश्नांची रोखठोक उत्तरे दिली. माणिकराव कोकाटे यांचा राजीनामा, आमदार शंकर मांडेकर यांच्या भावाकडून झालेला गोळीबार आणि सूरज चव्हाण प्रकरणावर देखील अजित पवार यांनी स्पष्ट सांगितले. एखाद्याच्या नतेवाईकाने गोळी चालवली असेल तर त्या नातेवाइकाचा दोष असतो का? असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. तर माणिकराव कोकाटे यांच्याशी चर्चा करून त्यानंतरच मुख्यमंत्र्यांशी चर्चा करणार असल्याचे त्यांनी प्रसार माध्यमांशी बोलताना सांगितले. सूरज चव्हाण यांच्या संदर्भातला निर्णय देखील आपण लवकरच घेणार असल्याचे ते म्हणाले.

या संदर्भात अजित पवार यांनी सांगितले की, छावा संघटनेचे विजय गाडगे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी माझी भेट घेतली. त्यांनी लातूरमध्ये घडलेल्या घटनेची सर्व तपशीलवार माहिती माझ्यासमोर मांडली. त्यांच्या तक्रारी अत्यंत गांभीर्याने ऐकून घेत, मी तात्काळ लातूरच्या पोलिस अधीक्षकांना सखोल चौकशी करून संबंधित दोषींवर कठोर कारवाई करण्याचे स्पष्ट आदेश दिले आहेत. तसेच, छावा संघटनेच्या इतर मागण्या बाबतही सकारात्मक आणि त्वरित निर्णय घेतला जाईल असा विश्वास मी त्यांना दिला आहे.

ADMISSION OPEN
10th, 12th and Graduate Students
Government Recognised
Job Guarantee Courses
DMLT | P.G.DMLT
X-RAY | C.T.-SCAN
E.C.G. | Radiology
Physiotherapy | Optometry
O. T. TECHNICIAN
PG Radiology
Contact : 9405109103 8830838903

# निवृत्तीनंतर कोणतेही शासकीय लाभाचे पद स्वीकारणार नाही : सरन्यायाधीश भूषण गवई




**अमरावती** : सर्वोच्च न्यायालयाचे विद्यमान सरन्यायाधीश आणि महाराष्ट्राचे सुपुत्र असलेले भूषण गवई यांनी निवृत्तीनंतर कोणतेही शासकीय लाभाचे पद स्वीकारणार नसल्याचे म्हटले आहे. मी निवृत्तीनंतर जास्तीत जास्त वेळ दारापूर, अमरावती आणि नागपुरात या आपल्या मूळ गावी घालवणार असल्याचे गवई यांनी म्हटले आहे. सरन्यायाधीश झाल्यानंतर प्रथमच भूषण गवई हे त्यांच्या मूळ गाव असलेल्या दारापुरात पोहोचले होते. यावेळी ते गावकऱ्यांशी बोलत होते. सरन्यायाधीश भूषण गवळी यांचे गावातील नागरिकांच्या वतीने जल्लोषात स्वागत करण्यात आले. सरन्यायाधीशांना पाहण्यासाठी गावकऱ्यांनी देखील मोठ्या प्रमाणात गर्दी केली होती. गावात पोहोचताच गवई यांनी आपल्या लहानपणीच्या आठवणींना उजाळा दिला. तसेच जुन्या घराला देखील भेट दिली.

यावेळी सरन्यायाधीश यांनी विकंदर महाराज, राजे बुवा महाराज, हनुमान मंदिर आदी ठिकाणी भेट देऊन दर्शन घेतले. शाळेतील चिमुकल्या विद्यार्थ्यांनी सरन्यायाधीशांचे अगदी उत्साहात स्वागत केले. तसेच भारत माता की जय, अशा घोषणा दिल्या. एकोप्याने राहणाऱ्या गावाचे प्रतीक म्हणजे दारापूर गाव असल्याचे सरन्यायाधीश यांनी म्हटले आहे.

न्यायमूर्ती भूषण रामकृष्ण गवई हे भारताचे ५२वे सरन्यायाधीश आहेत. त्यांचा जीवनप्रवास महाराष्ट्रातील अमरावती पासून सर्वोच्च न्यायालयापर्यंतचा एक प्रेरणादायी प्रवास आहे.

बालपण आणि कुटुंब

भूषण गवई यांचा जन्म २४ नोव्हेंबर १९६० रोजी अमरावती, महाराष्ट्र येथे झाला. त्यांचे वडील, आर. एस. गवई, हे रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (गवई गट) चे नेते होते आणि त्यांनी बिहार, सिक्कीम आणि केरळ या राज्यांचे राज्यपाल म्हणून देखील सेवा दिली. ते लोकसभेचे सदस्यही होते. गवई कुटुंब डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांनी प्रेरित असून, बौद्ध धर्माचे अनुयायी आहेत. त्यांचे बंधू, राजेंद्र गवई, हेही राजकारणात सक्रिय आहेत.

कायदेशीर कारकीर्द

शिक्षण: भूषण गवई यांनी नागपूर विद्यापीठातून बी.ए. आणि एल.एल.बी. पदवी प्राप्त केली.

वकील म्हणून प्रारंभ : १६ मार्च १९८५ रोजी त्यांनी वकिलीची नोंदणी केली आणि बारिस्टर राजा एस. भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली काम केले.

स्वतंत्र वकिली : १९८७ ते १९९० या काळात मुंबई उच्च न्यायालयात स्वतंत्रपणे वकिली केली.

नागपूर खंडपीठ : १९९० नंतर त्यांनी मुख्यतः नागपूर खंडपीठात संविधानिक आणि प्रशासकीय कायद्यांवर काम केले.

शासकीय वकील : १९९२ ते १९९३ या काळात ते सहाय्यक सरकारी वकील आणि अतिरिक्त सरकारी अभियोक्ता म्हणून कार्यरत होते.

सरकारी अभियोक्ता : १७ जानेवारी २००० रोजी त्यांची नागपूर खंडपीठासाठी सरकारी अभियोक्ता म्हणून नियुक्ती झाली.

उच्च न्यायालय न्यायाधीश : १४ नोव्हेंबर २००३ रोजी ते मुंबई उच्च न्यायालयाचे अतिरिक्त न्यायाधीश म्हणून नियुक्त झाले आणि १२ नोव्हेंबर २००५ रोजी कायमस्वरूपी न्यायाधीश झाले.

सर्वोच्च न्यायालय न्यायाधीश : २४ मे २०१९ रोजी ते भारताच्या सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश म्हणून नियुक्त झाले.

इतर भूमिका : ते महाराष्ट्र नॅशनल लॉ युनिव्हर्सिटी, नागपूरचे कुलगुरू आणि राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरणाचे कार्यकारी अध्यक्ष म्हणूनही कार्यरत आहेत .

सरन्यायाधीशपदाची शपथ घेतली

भूषण गवई हे भारताचे पहिले बौद्ध सरन्यायाधीश आहेत आणि अनुसूचित जातींमधून हे पद भूषवणारे दुसरे न्यायाधीश आहेत. त्यांनी सामाजिक आणि राजकीय न्यायासाठी डॉ. आंबेडकरांच्या विचारांना अनुसरून काम करण्याची प्रतिज्ञा घेतली आहे. त्यांचा जीवनप्रवास हा सामाजिक न्याय, समर्पण आणि कष्टाच्या मूल्यांचा आदर्श आहे. त्यांच्या नेतृत्वात भारतीय न्यायव्यवस्थेतील समावेशिता आणि विविधता अधिक बळकट होईल, अशी अपेक्षा आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार २६ जुलै २०२५


# दौलताबाद घाटात प्रियकराने ढकलून प्रेमिकेचा खून केला



आरोपी सुनील खंडाँगळे

मयत दिपाली

दिपीची दोन वर्षाची मुलगी गायत्री

**दौलताबाद (जावेद अहेमद) :** दौलताबाद घाटात प्रियकराने ढकलून प्रेमिकेचा खून केला. आरोपी ने घटनेनंतर शिउर पोलीस स्टेशनमध्ये केले आत्मसमर्पणदीपाली गणेश अस्वार वय २३ वर्ष राहणार माळीवाडा हल्ली मुकाम लालमती अब्दीमंडी हीचा मृत्यूदेह दौलताबाद घाटात मिळून आल्याने खळबळ उडाली.

मिळालेल्या माहितीनुसार दि २५ शुक्रवारी दुपारी दौलताबाद पोलीस स्टेशनमध्ये शिउर तालुका वैजापूर येथून फोन आला की आरोपी सुनील सुरेश खंडागळे वय २५ वर्ष राहणार लाखनी मांडकी तालुका गंगापूर याने आत्मसमर्पण करून सांगितले की मी दीपाली गणेश अस्वार या मुलीचा मारहाण करून रोडवर डोके आपटून दौलताबाद येथील घाटात खून केला आहे.

शहनिशा करण्यासाठी दौलताबाद पोलीस निरीक्षक रेखा लोंढे, उपनिरीक्षक सुनील बोडखे, महेश घुगे यांनी घटनास्थळी धाव घेऊन शोध घेतला असता त्यांना दौलताबाद खुलताबाद रस्त्यावरील डोंगराच्या पायथ्याशी असलेल्या मोमबत्ता तलावाच्या रोडच्या वरील बाजूस एका मुलीचे मृत्यूदेह मिळून आले खाली दरीत असल्याने मृत्यूदेह काढण्यासाठी अग्निशमन दलाचे अधिकारी अशोक खांडेकर, हरिभाऊ घुगे, जवान सूरज राठोड, संदीप चव्हाण, अजिंक्य भगत, लव घुगे, दीपक गाडेकर, उमेश भोसले, नंदकिशोर घुगे यांच्या मदतीने दरीतून शव बाहेर काढून उत्तरणीय तपासणी साठी घाटी रुग्णालयात पाठवण्यात आले.

दीपाली अस्वार हिचे लग्न पाच वर्षांपूर्वी शंकर वाल्मिक त्रिभुवन राहणार लोणी तालुका वैजापूर याच्या सोबत झाले होते. दीपाली ही नवऱ्याला सोडून पाच महिन्यापासून आपल्या लहान मुलगी गायत्री दोन वय दोन वर्षे सोबत माहेरी अब्दीमंडी लालमाती येथे माहेरी आजी कडे राहत होती.

शंकर अनेक वेळा दीपाली ला घेण्यासाठी आला पण ती नांदायला गेली नाही नंतर आठ दिवसापूर्वी शंकर आपली लहान मुलगी गायत्री हिला सोबत घेऊन घरी गेला होता. दोन दिवसांपूर्वी दीपाली ही दि २३ जुलै रोजी अब्दीमंडी आजीच्या घरातून बाहेर निघून आपली लहान विवाहीत बहीन हिच्या कडे आंधनेर तालुका कन्नड येथे गेली होती ती सुनीलने तिथे जाऊन भांडणं करून सोबत दि २४ गुरुवारी रात्री दहा वाजता घेऊन गेला.

आता तिचे शवच सापळले घटनेवरून हे सर्व प्रकरण प्रेमप्रकरणातून घडलेला प्रकार असल्याचे दिसून येते. दीपाली च्या आई नंदाबाई गणेश अस्वार यांच्या फिर्यादी वरून दौलताबाद पोलीस स्टेशनमध्ये खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आले आहे. आरोपी सुनील सुरेश खंडागळे याला शिउर पोलीस यांच्या कडून ताब्यात घेऊन अटक करण्यात आली आहे.

सुनील खंडाँगळे हा दीपाली च्या मामाचा मेव्हणा होता तो गावात हायवा वर मजुरी काम करत होता त्याला आई वडील दोन भाऊ, सहा बहिणी आहेत. पुढील तपास पोलीस निरीक्षक रेखा लोंढे हे करत आहे

# दौलताबाद येथे कुत्र्याने तोडले चार लोकांचे लचके



**दौलताबाद (जावेद अहेमद) :** दि २५/०७/२०२५ कुत्र्याने तोडले चार लोकांचे लचके. दौलताबाद परिसरात मोकाट कुत्र्यांचा सुळसुळाट झाला असून दौलताबाद, अब्दीमंडी, माळीवाडा, फतियाबाद आदी गावामध्ये मोठ्या प्रमाणात कुत्र्यांचा वावर झाला असून मुख्य रस्त्यावर हे कुत्रे बिंदास फिरत असल्याने रोज छोटे-मोठे अपघात घडत आहे. शुक्रवारी सकाळी सात ते दहा दरम्यान फतियाबाद येथे असेच एका मोकाट कुत्र्याने चार जणांचा चावा घेतला यात वृद्ध,महिला व शालेय विद्यार्थ्यांचा समावेश आहे.

आण्णा खंडू खील्लारे,वय.६० वर्षे, प्रतीक सोमनाथ भास्कर, व.१४ वर्षे,अप्सरा बेग, व.५८ वर्षे,संगिता जाधव, व.५० वर्षे सर्व रा.फतियाबाद यांना कूत्र्यान चावले. ग्रामस्थांचे म्हणणे आहेकी छत्रपती संभाजीनगर येथून कुत्रे आणून आमच्या गावात सोडण्यात येते संबंधित विभागाने या बाबीकडे लक्ष द्यावे व मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त करावे अशी मागणी ग्रामस्थांकडून केली जात आहे.







महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार २६ जुलै २०२५


# शिक्षणातून एकतेची आणि सहजीवनाची भावना वाढली पाहिजे. प्रा. डॉ. जयकुमार मगर





**छत्रती संभाजीनगर :** शिक्षणाने स्वत:ची ओळख निर्माण होते. आपण कोण आहोत हे कळते. शिक्षण हे स्वउद्धाराबरोबरच समाज व देशाच्या विकासाचे सर्वात प्रभावी माध्यम असून शिक्षणातून एकतेची आणि सहजीवनाची भावना वाढली पाहिजे असे प्रतिपादन भुगोलतज्ञ आणि ज्येष्ठ लेखक, विचारवंत प्रा. डॉ. जयकुमार मगर यांनी केले.

प्रतिभा शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक अध्यक्ष स्व. प्रा. आर. एस. पाटील यांच्या जयंती निमित्त गुणवंत विद्यार्थी सत्कार समारंभप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वत्सलाबाई पाटील माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक शैलेंद्र पाटील हे होते. प्रतिभाताई पाटील प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक प्रकाश ढमाले, संस्थेचे सदस्य अमलेश पाटील, देवेंद्र पाटील, दै. महाराष्ट्र जनशक्ती आणि एम. जे. न्यूज चे मुख्य संपादक प्राचार्य डॉ. हसन इनामदार यांची प्रमुख उपस्थिती होती.

या कार्यक्रमातच प्राचार्य हसन इनामदार यांच्या मातोश्री डॉ. कंचन शांतीलालजी देसरडा महाविद्यालय याच्या वतीने प्रा. सुरेश पुरी गुणवत्ता गौरव पुरस्कार देऊन गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार देखील करण्यात आला.

या प्रसंगी प्राचार्य डॉ. हसन इनामदार, मुख्याध्यापक शैलेंद्र पाटील, मुख्याध्यापक प्रकाश ढमाले, सहशिक्षिका एस. पी. मुगदल, सी. पी. पगार, बडक सर, शिल्पा पाटील यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमाचे सुत्रसंचालन एस. डी. सुरडकर यांनी केले तर एम. ए. पाटील मॅडम यांनी उपस्थितांचे आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी ज्येष्ठ शिक्षक कोलते सर, वल्ले सर, मुंढे सर, राजहंस सर, आणि सर्वशिक्षक, शिक्षिका आणि कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.


डॉ. दत्ताभाऊ पाथ्रीकर शिक्षण प्रसारक मंडळाचे संचालक आणि बालरंगभूमी परिषदेचे जिल्हा कार्यकारिणी सदस्य मा. श्री. सय्यद अल्ताफ शब्बीर यांना वाढदिवसानिमित्त

हार्दिक शुभेच्छा...



शुभेच्छुक

डॉ. दत्ताभाऊ पाथ्रीकर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित

मातोश्री डॉ. कंचन शांतीलालजी देसरडा महाविद्यालय सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार २६ जुलै २०२५

## आ. संजनाताई जाधव यांच्या हस्ते आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटूंबियांना धनादेशाचे वाटप



**कन्नड (अरुण थोरात):** कन्नड शहरातील शासकीय विश्रामगृह येथे दि.२५ जुलै रोजी एक महत्त्वपूर्ण उपक्रम पार पडला. आत्महत्याग्रस्त दहा शेतकरी कुटूंबातील वारसांना गोपीनाथ मुंढे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह अनुदान तर महसूल विभाग अंतर्गत शेतकरी आत्महत्या प्रकरणातील ०२ वारसांना, तसेच पशुधन मृत्यू प्रकरणातील १३ पात्र शेतकरी कुटुंबियांना शासनाच्या वतीने एकूण २५ वारसांना आर्थिक मदतीचे धनादेश आमदार सं◌ंजनाताई जाधव यांच्या हस्ते वाटप करण्यात आले.

या कार्यक्रमात गरजूंना वेळेवर आणि थेट मदत पोहोचवण्याचा शासनाचा हेतू अधोरेखित झाला. संकटग्रस्त शेतकरी कुटुंबांसाठी ही आर्थिक मदत दिलासा देणारी असून त्यांच्या पुनर्वसनाच्या दिशेने महत्त्वपूर्ण पाऊल आहे.

शेतकऱ्यांच्या पाठीशी शासन सदैव उभे आहे, हेच या उपक्रमातून पुन्हा एकदा स्पष्ट झाले. याप्रसंगी तहसीलदार विद्याचरण कडवकर, कृषी अधिकारी श्री. शिरसाठ तसेच सर्व शासकीय अधिकारी, रामेश्वर घनकर, दत्ता सोनवणे, जितू भेंडाळे, बाबुराव बनकर, नगरसेवक कैलास जाधव, नितीन सुसलादे, विकास वाघ, अमर पाटील, रितेश जाधव आदींसह शिवसेना पदाधिकारी, शेतकरी उपस्थित होते.

## स.भु. प्रशालेत गोविंदभाई श्रॉफ यांची जयंती साजरी




**छत्रपती संभाजीनगर :** श्री सरस्वती भुवन प्रशाला छत्रपती संभाजीनगर येथे पद्मविभूषण गोविंदभाई श्रॉफ यांची ११४ वी जयंती साजरी करण्यात आली. यावेळी सातवी फ वर्गातील योगेश पाटील गोविंदभाईंच्या वेशभूषेत होता. समिका देशपांडे , रिद्धी कोकीळ, तनिषा सूर्यवंशी या विद्यार्थिनीनी गोविंदभाईंच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकला.

चिन्मय कुलकर्णी, जानवी शिंदे, तितीक्षा येवले, आर्या देशमुख या विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या भित्तिपत्रकांचे विमोचन करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जान्हवी काटकर तर आभार प्रदर्शन नभा श्रॉफ हिने केले. कार्यक्रमासाठी शालेय समितीचे अध्यक्ष ज्ञानप्रकाश मोदाणी यांनी विद्यार्थ्यांना भाईंच्या जीवनातील प्रसंग सांगितले याप्रसंगी प्रशालेचे मुख्याध्यापक विश्वरूप निकुंभ, उपमुख्याध्यापक अनिल देशमुख, पर्यवेक्षक विजय चापाईतकर यांची उपस्थिती होती.

या विद्यार्थ्यांना वर्गशिक्षिका शुभांगी पांगरकर यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमास सर्व शिक्षक व शिक्षकेतर सहकारी यांची उपस्थिती होती.

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

## ज्ञानदेव

जगण्याचं भान! जीवनाचं ज्ञान!
अमृताचं दान! ज्ञानदेव!!

रेड्यामुखी वेद! गाडे भेदभाव!
जगी एक नाव!ज्ञानदेव!!

मुखी हरिपाठ! नाम जप थोर!
वेदांचा तो सार! ज्ञानदेव!!

इंद्रायणी तिरी! सिद्ध बेटावरी!
पाया वारकरी! ज्ञानदेव!!

**ज्ञानेश्वर गायके,**
**कन्नड**
**मो.9403384889**



महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार २६ जुलै २०२५

# शाश्वत विकासासाठी जैविक शेतीची आवश्यकता संशोधक विशाल देशमुख यांचे प्रतिपादन





**जालना (प्रतिनिधी) :** 'महिको' बी-बियाणेद्वारे कृषीक्षेत्रात क्रांतिकारी बदल घडवून सर्वसामान्य शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावणारे जागतिक अन्न पुरस्कार विजेते पद्मभूषण बद्रीनारायण बारवाले यांच्या स्मृतिदिनानिमित्ताने व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ग्रो इंडियाचे संशोधन अधिकारी विशाल देशमुख यांचे "जैविक खताचे आजच्या शेतीत महत्व" या विषयावर व्याख्यान झाले.

याप्रसंगी कृषीभूषण विजयअण्णा बोराडे, डॉ. उषा झेर, श्री. रामकिशनजी मुंदडा, श्री. सुरेशजी अग्रवाल, श्री. अरुण अग्रवाल, सौ.सविताजी बगडिया, माजी प्राचार्य डॉ. रामलालजी अग्रवाल यांची उपस्थिती होती. प्रारंभी प्राचार्य डॉ. कविता प्राशर यांनी प्रास्ताविकात व्याख्यान आयोजन करण्याची भूमिका स्पष्ट केली. यावेळी कृषीभूषण विजय अण्णा बोराडे यांनी बद्रीनारायण बारवाले यांच्या आठवणींना उजाळा दिला. बॅरिस्टर गांधी आणि माझे आजोबा यांच्या माध्यमातून मी सातत्याने बारवाले साहेबांपासून खूप शिकलो. लहानपणापासून माझा त्यांच्याशी स्नेह होता. शेतकऱ्यांना एकदा प्रशिक्षित केले की तो प्रामाणिकपणे आपले कार्य करतो हा विश्वास बारवाले साहेबांना होता. कृषी क्षेत्रातील त्यांचे योगदान उल्लेखनीय असून वसंतराव नाईक मुख्यमंत्री असताना त्यांनी शेतकऱ्यांचे विविध प्रश्न मांडलेत. बारवाले साहेब आणि वसंतराव नाईक यांचे स्नेहपूर्ण संबंध होते. वसंतराव नाईक यांच्या काळात शेतकऱ्यांना सन्मान होता. त्यांच्या आजूबाजूला असणारी मंडळी शेतकऱ्यांचा विचार करणारी होती. शेतकऱ्यांशी सातत्याने तेव्हा संवाद व्हायचा.

यातून शेतकरी कसा संपन्न होईल याचा विचार बारवाले साहेबांनी केला होता; मात्र आता परिस्थिती बदलली आहे. मराठवाडा शेती सहाय्य मंडळाला त्यांनी मोठे सहकार्य केले. हैदराबाद मुक्तिसंग्रामातही त्यांनी सहभाग घेतला होता.श्री. विशाल देशमुख यांनी यावेळी कृषी क्रांतीमध्ये झालेल्या हरितक्रांतीचा आढावा घेत शेतीमध्ये झालेल्या आमुलाग्र बदलाचे विश्लेषण केले. यावेळी त्यांनी जैविक खते व त्याचे प्रकार, जैविक कीड आणि रोग व्यवस्थापन याची माहिती दिली.ते म्हणाले की, अलीकडे शेतीतील उत्पादन पद्धतीमध्ये आमुलाग्र बदल झाले असून त्याचे अनिष्ट परिणामही आपणाला भोगावे लागत आहे. जमिनीमधील उपयुक्त सूक्ष्मजीवांचे प्रमाण कमी झाल्यामुळे पिकाचे पोषण कमी झाले असून मातीची सुपीकता आणि पिकाची उत्पादकता कमी झाली आहे. जमिनीचा पोत घसरला असून शेत जमिनीची पाणी धरून ठेवण्याची क्षमता आणि मातीचा भुसभुशीतपणा आणि सामू कमी झाला असून जमिनीतील कार्बनचे प्रमाणही कमी झाले आहे.

या अशा पार्श्वभूमीवर जैविक शेतीचे महत्व आहे.जैवउत्तेजकाचे फायदे स्पष्ट करताना ते म्हणाले की, हवामानातील बदल ( उष्णता, थंडी, दुष्काळ) अशा प्रतिकूल परिस्थितीतही पिकांची योग्य प्रकारे वाढ होते. मातीतील पोषणद्रव्यांचा जास्तीत जास्त उपयोग केल्या जातो. सूक्ष्मजीवांचे संतुलन राखण्यास मदत होत असल्यामुळे मातीचे आरोग्य सुधारते. परिणामी पिकांची गुणवत्ता आणि एकूणच उत्पादनक्षमता वाढते. रासायनिक खतांची गरज कमी होते, त्यामुळे शेतजमीन अधिक उपजाऊ बनते.जैविक किडनाशके, रोगनाशके वापरण्याचे फायदेही त्यांनी सांगितले. ते म्हणाले, जैविक किडनाशके हे प्रामुख्याने किडीनाच लक्ष्य करतात. त्यांच्या विषारी अवशेषांचा धोका मानवाला नसून ते पर्यावरणपूरक असतात. यामुळे कीटकसमुदायामध्ये प्रतिकारक्षमता विकसित झाल्याचे आढळत नाही. रासायनिक कीटकनाशकांमुळे होणारे दुष्परिणाम टाळता येतात. जैविक कीडनाशकांमध्ये अनेक प्रकारची रसायने असतात, त्यांच्या पुढे टिकाव धरण्यासाठी किडीला पुढच्या पिढ्यांमध्ये गुणसूत्रात बदल करणे कठीण जाते.

अध्यक्षीय समारोप करताना डॉ. उषा झेर यांनी कृषी क्षेत्रातील पर्यावरणीय बदल यावर भाष्य केले. शाश्वत कृषी विकासासाठी आता मोठे बदल आपणाला करावे लागेल हे सांगून त्या म्हणाल्या, विविध प्रकारचे फर्टीलायझर वापरल्यामुळे जमिनीवर परिणाम होतो. आपणाला पिकाची समृद्ध वाढ डोळ्याने दिसते मात्र त्यासाठी वापरण्यात आलेल्या रासायनिक खतामुळे विविध प्रकारचे वायू निर्माण होतात व हे पर्यावरणासह मानवी जीवनालाही धोकादायक आहे. याची आपण काळजी घेतली पाहिजे. कृषी क्षेत्रात अधिकाधिक विज्ञान आणि नवोपक्रम आणून शेतकरी समृद्ध झाला पाहिजे हे बारवाले साहेबांचे स्वप्न होते.

शेतकरी सुखी व्हावा यासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले. त्यांनी सांगितलेल्या मार्गावरून आम्ही जात आहोत असेही त्या म्हणाल्या.यावेळी शहरातील प्रतिष्ठीत मान्यवर, परिसरातील शेतकरी, खरपुडी येथील कृषी विज्ञान केंद्राचे विद्यार्थी, संशोधक यांच्यासह शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी यांची उपस्थिती होती. सूत्रसंचालन करून आभार प्रा. विलास भुतेकर यांनी मानले.



